
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 1 | OCTOBER - 2023

# उत्तर आधुनिकावादातील इतिहासलेखनमीमांसा

**डॉ. सचिन ज्ञानेश्वर मोरे**
**इतिहास विभाग, अहमदनगर महाविद्यालय,अहिल्यानगर.**



इतिहास ही भूतकाळाची कहाणी असली तरी वर्तमानाची गरज आहे. इतिहासाचा काळाच्या टप्प्यांवर पुन्हा पुन्हा अभ्यास करावा लागतो. नवनवीन मूल्यांच्या कसोट्यांवर भूतकालीन घटनांचा धांडोळा घ्यावा लागतो. त्यामुळेच इतिहासाचे पुनर्लेखन करणे गरजेचे ठरते. भूतकालीन घटनांचा पुराव्यांच्या आधारे शास्त्रीय पद्धतीने मांडणी करून इतिहासकार इतिहासलेखनाच्या जबाबदारीतून तात्पुरता रिकामा होता. परंतु, काळाच्या ओघात त्याच घटनांचे नवीन पुरावे सापडतात किंवा एखादा अभ्यासक त्याच्या  नवीन दृष्टीकोनातून अभ्यास करून नवीन मांडणी करतो. त्याच घटनेला नवीन अन्वयार्थ निर्माण होतो. या सर्व संशोधनप्रक्रियेत इतिहासलेखनाचे नवीन दालन उघडे होते. असे म्हटले तर वावगे ठरू नये.

इतिहासलेखनाचा कला आणि शास्त्र या दोन्ही प्रकारात समावेश होतो. इतिहासलेखनाने काळाच्या टप्प्यांवर लेखन पद्धतीत बदल करीत इतिहास विषयाच्या ज्ञानाच्या कक्षा  रुंदावल्या आहेत. त्यातून इतिहासाची व्याप्ती वाढीस लागली.  पारंपरिक पद्धतीतून हे लिखाण मुक्त झाले आणि;  सवंग भूतकाळाची मांडणी करणारे साधन ठरले. विसाव्या शतकात या लेखनपद्धतीमध्ये आधीच्या लेखनाला छेद देणारा प्रवाह निर्माण होऊ लागला. इतिहासलेखन या संज्ञेला उत्तर आधुनिकावादाने अंर्तबाह्य ढवळून काढले आहे व नवा अन्वयार्थ प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला आहे. वस्तुत: 'इतिहासलेखनमीमांसा' ही संज्ञा इंग्रजीतील 'हिस्टोरिओग्राफी', या इंग्रजी शब्दाचे मराठी भाषांतर आहे. तसेच उत्तरआधुनिकावाद ही संज्ञा 'पोस्ट मॉडर्निझम' या इंग्रजी शब्दाचे मराठीकरण आहे. मुलत: ही संकल्पना भाषेच्या संदर्भात विकसित झाल्याचे दिसते. इतिहासलेखन करताना जो लेखनाचा म्हणजेच भाषेचा भाग येतो त्याचा बारकाईने विचार करून त्यातील अनेक अंत:स्तर शोधण्याचा उत्तरआधुनिकावादाने प्रयत्न केला आहे. त्यामुळे उत्तर आधुनिकावादाचा विकसित झालेला अवकाश लक्षात घेणे गरजेचे ठरते.

इतिहास ही एक ज्ञानशाखा असून त्यातील संशोधनात व लिखाणात येणाऱ्या समस्यांचे कालानुसार निराकरण होत आलेले आहे. सर्व सामाजिक शास्त्रात इतिहासाचा अन्वयार्थ काढणे हे अद्वितीय व साहसी उपक्रम आहे. ज्यात संशोधकाला भूतकाळात काय झाले एवढेच सांगायचे नसते तर भूतकाळाविषयी लेखनकृती करायची असते. इतिहास शास्त्र आणि कला या दोन्ही प्रकारात मोडत असल्याने संशोधकाचे काम अधिक बिकट होते. इतिहासकार आपल्या लिखाणातून भुतकाळ प्रतिबिंबित करीत असतो. योग्य घटक आणि मर्यादित शक्यतेतील अमर्याद अन्वयार्थ काढण्यासाठी इतिहास संशोधकास आकृतिबंध सैद्धांतिक साधन म्हणून मदत करतो. इतिहास संशोधनात परिणामकारकता, उपयोजितता व योग्य मूल्यमापनासाठी इतिहासकारांनी  त्याचे स्वरूप समजून घेणे गरजेचे आहे

इतिहास संशोधन इतर सामाजिक शास्त्रांपेक्षा वेगळे असल्याचे दिसून येते. 'मुलभूत संकल्पनांची निर्मिती, ज्ञानाच्या कक्षा रुंदावणे आणि काहीतरी नवीन शोधणे संशोधनात अपेक्षित असते.'[१]  आंतर विद्याशाखीय पद्धतीत सामाजिकशास्त्राच्या बदलणाऱ्या संशोधन प्रक्रीयेसंदर्भात व्ही. आर. पंचमुखे म्हणतात, "संशोधनाचे पाच महत्वाचे स्तंभ आहेत. एक म्हणजे संशोधक, दुसरा विषय, पद्धतीशास्त्र आणी माहिती, तिसरा संशोधनाची गुणवत्ता, चौथा आंतविद्याशाखीय संशोधन आणि पाचवा म्हणजे संशोधन संस्था होय."[२]  यावरून

इतिहासाचे संशोधनाचे स्वरूप लक्षात येते. कालानुरूप इतिहास संशोधन व दृष्टीकोनात बदल होत गेलेले आहेत. सोळाव्या शतकात जग ही ईश्वरी रचना आहे समजले गेले. अठराव्या शतकात बुद्धिवाद आला आणि वैज्ञानिक क्रांती झाल्यानंतर ज्ञानशाखा म्हणून इतिहासाची उपयोजिता सांगण्याचा प्रयत्न झाला; हा विषय तात्त्विक, ज्ञानवादी चिकित्सक आहे. आधुनिक काळात नेबूर रांके यांनी त्याचे स्वरूप निश्चित करून वस्तुनिष्ठतेवर भर दिला. अभ्यासविषय म्हणून इतिहासाची १९व्या व २०व्या शतकात द्रुतगतीने वाढ झाली. परिणामी इतिहासलेखन पद्धतीतील सीमारेषा अंधुक होत जाऊन एकत्व शोधले जाऊ लागले. उत्तर आधुनिक काळात नवे विश्लेषण व भाषीय आच्छादन इतिहास संशोधनावर पडल्यानंतर तो स्तब्ध झाला.

विसाव्या शतकाच्या अखेरच्या पंचवीस वर्षात पाश्चात्य जगात, विशेषतः युरोपीय बौद्धिक क्षेत्रात अनेक संज्ञाप्रवाह प्रचारात आले. त्यापैकी एक महत्वाचा प्रवाह उत्तर आधुनिकावाद हा एक सिद्धांत, अगर एकजिनसी विचार नाही; अनेक विचारांचा मिळून बनलेला तो एक संच आहे."[३] असे शांता कोठेकर यांनी लिहिले आहे. डेव्हिड लीऑँन यांनी उत्तर आधुनिकता व उत्तर आधुनिकावादात फरक सांगितला आहे. ते म्हणतात, " उत्तर आधुनिकतेला सामाजिक संदर्भ आहे व उत्तर आधुनिकावाद विचार, संस्कृती व बौद्धिकतेशी निगडीत आहे."[४] उत्तर आधुनिकावाद प्रथम स्थापत्य, कला, साहित्य इ. क्षेत्रात आला व त्यांनतर त्याचे लोण समाज, तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र व इतिहासापर्यत येऊन पोहचले. त्याचा परामर्श घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत पेपरमध्ये केला आहे.

## उत्तर आधुनिकवादाचे इतिहासाला आव्हान :-

उत्तर आधुनिक फक्त इतिहासाकडेच सत्याचा दावा करीत नाहीत तर सामाजिक मानववंशशास्त्राकडे त्यांचा सत्याचा आग्रह आहे. उत्तर आधुनिकता पारंपरिक इतिहासातील वास्तव नाकारते. उत्तर आधुनिकावादात ज्ञानाचे विकेंद्रीकरण, पुनरेखाटन व पुर्नवर्णन या घटकांचा समावेश होतो. उत्तर आधुनिकता उच्चभ्रू संस्कृती व सामान्य संस्कृती यांच्या भेदभावातील सीमा रेषा काढून टाकते. कारण पारंपरिक इतिहास उच्चभ्रूंच्या कल्पना व्यक्त करतो ज्या एका विशिष्ट हेतूसाठी लिहिलेल्या असतात. भाषीय सिद्धांत उत्तर आधुनिकवादामध्ये हे लिखाण नाकारते. कारण उत्तर आधुनिकवाद्यांच्या मते, 'इतिहासातील नोंदी भूतकाळात अस्तित्वात नसल्याने तो फक्त अशा लिखित गोष्टींत कैद झाला. लेखकाने तो स्वच्छंदीपणे लिहिला व पुस्तकावरून पुस्तक निर्माण झाले.'[५] यामध्ये फक्त सत्याचे ढोंग व मुखवटा घालून घटीतांचा संग्रह केलेला आहे यामुळे उत्तर आधुनिकवाद आधुनिकतेला नाकारतो. 'आधुनिकवाद्यांनी भुतकाळ नष्ट करण्याचा प्रयत्न केला याउलट उत्तर आधुनिकवाद्यांनी भूतकाळाचे उपरोधिक पुर्नपृष्टीकरण आणण्याचा प्रयत्न केला.'[६]

## ऐतिहासिक सिद्धांताची आधुनिकोत्तर चिकित्सा :-

पारंपरिक इतिहासलेखनात घटीते, साधने, कार्यकारणभाव, वस्तुनिष्ठता हे घटक महत्वाचे आहेत. उत्तर आधुनिकवाद या घटकांची चिकित्सा करतो.

## घटीते :-

रूढीबद्ध इतिहासलेखनात तथ्यांना किंवा घटीतांना इतिहासाचा पाठीचा कणा समजला जातो. उत्तर आधुनिक आणि स्त्रीवादी इतिहासकार डायने पुरकीस म्हणतात, "एखादे ऐतिहासिक तथ्य सोदाहरण स्पष्ट करण्यासाठी इतिहासकार बांधील नाही."[७] कारण इतिहासातील भूतकाळाच्या बाबतीत कुणीतरी विशिष्ट हेतूने व विशिष्ट दृष्टीकोनातून लिहिलेले असते. त्यासाठी भूतकाळाचा अभ्यास करताना इतिहासकाराच्या मनात डोकावणे गरजेचे असते.

## साधने :-

उत्तर आधुनिक इतिहासकार साधनांकडे कायमचे व न बदलणारे घटक म्हणून पाहत नाहीत. घटीतांचा अन्वयार्थ अंतहीन असून शब्दांना मर्यादा आहे. इव्हन्स 'इन डिफेन्स ऑफ हिस्ट्री' या पुस्तकात म्हणतात, " शब्द हे स्वच्छंदी चिन्हे नाहीत आणि भाषा जगाची प्रतिबिंब करीत नाही."[८] यावरून लक्षात येते की, भाषा ही पूर्णपणे स्व-प्रतिबिंब असून फक्त बाह्य वस्तूंचे वर्णन करते.

### कार्यकारणभाव :-

पारंपरिक इतिहासात कार्यकारणभाव महत्वाचा समजला जातो तर आधुनिकोत्तर इतिहासकार स्पष्टीकरणासाठी त्याला निष्फळ मानतात. हेडन व्हाईट म्हणतात, "कार्यकारणभाव वर्तमान लोकांचा त्यांच्या स्वतंत्र कृतीपासून भ्रष्ट करतो आणि त्यांच्या भविष्यातील कृतीवर साज चढवून त्यांना बंदिस्त करतो."[९] यावरून लक्षात येते की, आधुनिकोत्तर इतिहासकार परिणामांमुळे कारणे लक्षात घेतात.

### ऐतिहासिक वस्तुनिष्ठता :-

आधुनिकोत्तर इतिहासकार मानतात की भूतकाळात कुठल्याही प्रकारची वस्तुनिष्ठता शक्य नाही कारण सर्वज्ञान परस्परांशी संबधित आहे. वैयक्तिक भावनेपासून आणि पूर्वग्रहापासून दूर राहून भूतकाळात नेमके काय घडले, यांची कठोर मांडणीची अपेक्षा वस्तुनिष्ठ इतिहासात असते. 'इतिहासातील तथ्य आणि त्याचा अन्वयार्थ ही खोडकर अडचण असल्याचे आधुनिकोत्तर इतिहासकार नमूद करतात.'[१०] त्यामधून ऐतिहासिक वस्तुनिष्ठतेच्या पारंपरिक ठोकताळे यामध्ये दिसत नाहीत.

### इतिहासावर उत्तर आधुनिकतेचा प्रभाव :-

इतिहासाची क्षमता वाढवणे हा उत्तर आधुनिकवादाचा उद्देश असल्याचे लक्षात येते. उत्तर आधुनिकतेमध्ये स्थानिक कथन महत्वाचे मानले गेले. जे विषय चाकोरीबाहेरचे आहे उदा. कैदी, गुन्हेगारी, विद्यार्थी, शेतमजूर इ. त्यात समावेश होऊ शकतो. उत्तर आधुनिकतेत इतिहासाच्या ज्ञानकक्षा वाढून विषयाला नवसंजीवनी मिळत आहे. इव्हन्स म्हणतात, "उत्तर आधुनिकवादी सिद्धांत कागदपत्राच्या जास्त जवळ जाऊन नवीन मार्गाने कथन करण्यास प्रवृत्त करतो. तसेच अधिक स्व-चिकित्सक व त्यांच्या विषय निष्ठतेचे भान देणे.... इतिहास लेखनाचा शास्त्रीय पद्धतीपासून साहित्यिक प्रारूपापर्यंतचा सार्वजनिक मार्ग निश्चित करते."[११]

उत्तर आधुनिकवाद हा एकजिनसी विचार किंवा सिद्धांत नसल्याने त्यात बदलणाऱ्या जीवनपद्धतीचा व संस्कृतीचा बहुविध दृष्टीकोनातून विचार होऊन वैचारिक गुंतावळा झाला आहे. हे लक्षात घेतले पाहिजे. मानव हा इतिहासाचा विषय असला तरी तो खंडित, विस्कळीत झाल्याने त्यात एकसूत्रता राहत नाही. फुको इतिहासाचे दोन प्रकारात वर्गीकरण करतो, 'पहिला सुसंगती व ऐक्य असलेला इतिहास म्हणजे Utopia म्हणजे Total history व दुसरा heteropia म्हणजे ऐतिहासिक ऐक्य नसलेला तुटक इतिहास याला तो general history म्हणतो."[१२] उत्तर आधुनिकवाद दुसऱ्या प्रकारात येतो.

उत्तर आधुनिक इतिहासलेखन हे इतिहासाकडे पाहण्याचा एक वेगळा दृष्टीकोन आहे, जो पारंपरिक इतिहास लेखनातील उणीवा नमूद करून नव्या पद्धतीला जन्म देतो.

### संदर्भ आणि टिपा :-


१. B. Sheikh Ali., History its theory and method, Macmillan India Limited, Madras, 1978, P.93.

२. Social Science Research in India, Institution and Structure Edi., M. Nandkarni, R.S. Deshpande, Acadamic Foundation, New Delhi, 2011, P. 289.

३. शांता कोठेकर, इतिहास : तंत्र आणि तत्त्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७, पृ. २५०.

४. कित्ता, पृ. २५१.

५. E. Sreedharan, A Textbook of Historiography, Orient Black Swan, 2009, P. 299.

६. Peter Barry, Beginning Theory, T.R. Publication LTD. 2002, P.91.

७. E. Sreedharan, P.301.

८. Ibid, 301.

९. Ibid, 303.

१०. Ibid, 304.

११. Ibid, 308.

१२. शांता कोठेकर, पुवोक्त, पृ. २६०.